POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३१० ● मुंबई, शुक्रवार, १२ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

ॲप-आधारित टॅक्सी कंपन्यांवर कारवाई करण्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांचे आदेश

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मागणीची परिवहन मंत्र्यांकडून तात्काळ दखल घेण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून विविध ॲप-आधारित टॅक्सी सेवांबाबत प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी समोर येत होत्या.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांच्या माध्यमातून प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागणे, अतिरिक्त रकमेची सक्ती करणे तसेच प्रवाशांच्या अडचणीचा गैरफायदा घेत आर्थिक शोषण करण्याच्या प्रकारांविरोधात कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी तक्रार दाख केली. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ दखल घेत संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून विविध ॲप-आधारित टॅक्सी सेवांबाबत प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी समोर येत होत्या. प्रवास स्वीकारल्यानंतर अतिरिक्त टिप किंवा जादा रकमेची मागणी करणे, ती न मिळाल्यास प्रवास रद्द करणे अथवा प्रवाशांना मानसिक त्रास देणे असे प्रकार वाढल्याने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत प्रवाशांकडून जबरदस्तीने टिप मागण्याचा प्रकार अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले. तसेच संबंधित कंपन्यांच्या कारभाराची चौकशी करून आवश्यक ती कठोर कारवाई करण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना देण्यात आल्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी परिवहन मंत्री सरनाईक यांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्याबद्दल खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभारही व्यक्त केले. ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवा देणाऱ्या कंपन्यांचा मनमानी कारभार रोखण्यासाठी परिवहन विभागाकडून महत्त्वपूर्ण उपाययोजना राबविण्यात येणार असून या क्षेत्रासाठी लवकरच नवीन ॲग्रीगेटर धोरण जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रवाशांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठविला असून ग्राहकांना पारदर्शक, न्याय्य आणि सुरक्षित सेवा मिळावी यासाठी त्यांनी ही मागणी केली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतर राज्य सरकारने तात्काळ पावले उचलल्याने लाखो प्रवाशांना दिलासा मिळेल.

मागणी काय होती?

ॲप-आधारित टॅक्सी आणि राईड-हेलिंग सेवांकडून प्रवाशांवर लादल्या जाणाऱ्या या अन्यायकारक पद्धतीविरोधात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना कठोर कारवाई करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले होते. तर गरजेच्या वेळी प्रवाशांना वेठीस धरणे, त्यांची अडचण ओळखून आर्थिक शोषण करणे आणि जादा रक्कम देण्यास भाग पाडणे, हा प्रकार ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा आहे. ही केवळ चुकीची व्यावसायिक पद्धत नसून ग्राहकांना अक्षरशः ओलीस ठेवण्यासारखी बाब आहे. ग्राहकांकडून स्वेच्छेने मिळणारी टिप ही सेवेच्या गुणवत्तेची पावती असते; मात्र टिप किंवा अतिरिक्त शुल्कासाठी दबाव टाकणे, सेवा नाकारण्याची धमकी देणे किंवा ग्राहकांना मानसिक त्रास देणे हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही.ग्राहकांना पारदर्शक, न्याय्य आणि सुरक्षित सेवा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे अशा शोषणात्मक आणि ग्राहकविरोधी प्रकारांवर तातडीने अंकुश ठेवून संबंधित कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी खासदार डॉ.शिंदे यांनी केली होती.

मान्सूनची गाडी अडकली!

राज्यात उकाड्याचा कहर कायम... 'या' कारणामुळे पाऊस पुढे सरकेना



■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्रात दाखल झालेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांची (मान्सून) वाटचाल सध्या मंदावली असून राज्यातील नागरिकांना आणखी काही दिवस उकाड्याचा सामना करावा लागणार आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनची उत्तर सीमा गेल्या दोन दिवसांपासून कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर परिसरातच स्थिरावली आहे. वातावरणातील आर्द्रतेचा अभाव आणि वाऱ्यांचा वेग कमी झाल्याने मान्सूनच्या प्रगतीला ब्रेक लागला आहे. मात्र, पुढील तीन ते चार दिवसांत हवामानात अनुकूल बदल होण्याची शक्यता असून त्यानंतर मान्सून पुन्हा वेग पकडू शकतो.

गुजरातवरील प्रतिचक्रवात ठरतोय अडथळा :

हवामान तज्ज्ञांच्या मते, गुजरात आणि उत्तर अरबी समुद्रावर सध्या प्रभावी प्रतिचक्रवात (ॲंटीसायक्लॉन) सक्रिय आहे. ही प्रणाली मान्सूनच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने कोरडी हवा खेचून आणत असल्याने मोसमी वाऱ्यांचा वेग कमी झाला आहे. परिणामी पावसाचे ढग तयार होण्यास अडथळा निर्माण होत असून मान्सूनची उत्तर दिशेकडील वाटचाल थांबली आहे.

सध्या अनेक भागांत आकाश ढगाळ दिसत असले तरी पावसासाठी आवश्यक असलेली ढगांची घनता निर्माण होत नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. प्रतिचक्रवाताचा प्रभाव कमी झाल्यानंतरच मान्सून मुंबई, पुणे आणि राज्यातील इतर भागांकडे वेगाने सरकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

'या' जिल्ह्यांना यलो अलर्ट:


दरम्यान, हवामान खात्याने गुरुवारी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा तसेच विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. या भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह आणि जोरदार वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दुसरीकडे मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांना अद्याप काही दिवस संयम बाळगावा लागणार असून, जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्यानंतरच पेरणी करण्याचा सल्ला कृषी आणि हवामान तज्ज्ञांनी दिला आहे.

मान्सूनची प्रगती तात्पुरती मंदावली असली तरी पुढील काही दिवसांत परिस्थिती सुधारण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे राज्यातील पावसाची प्रतीक्षा लवकरच संपण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

6 जून रोजी तळकोकणात मान्सून दाखल होऊनही ही परिस्थिती

कोकणात एकिकडे पावसाची हजेरी असली तरीही उत्तर कोकणातील काही भागासह मुंबई, नवी मुंबई आणि ठाण्यामध्ये उष्ण आणि दमट वातावरण कायम असेल. ज्यामुळं हा उष्मा असह्य होणार आहे. 6 जून रोजी तळकोकणात मान्सून दाखल होऊनही 11 जून आला तरीसुद्धा राज्याल मान्सूननं दिलेली ओढ आता अनेक चिंतांना वाव देऊन जात आहे. किमान पुढचे पाच दिवस राज्यातील कमाल तापमानात फारसे बदल होणार नाहीत अशी प्राथमिक माहिती हवामान विभागानं दिली आहे. तर, मान्सूनचे वारे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडूसह अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, आणि पश्चिम बंगालच्या काही भागांसह, छत्तीसगड, बिहार, झारखंड ओडिशाच्या काही भागात प्रवेश करतील, असा अंदाज भारतीय हवामान शास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. तेव्हा या वाटेनं मान्सून नेमका कोणत्या वेगानं प्रवास करतो हे पाहणं महत्त्वाचं असेल. मुख्य म्हणजे एल निनोचं सावट असल्यामुळं आतापासूनच जर ही तऱ्हा असेल तर येत्या काळात मान्सून नेमका तग धरेल की नाही? असा चिंतेचा सूरही आळवला जात आहे.



भाईंदर पश्चिमेच्या उत्तन परिसरात मंगळवारी जुन्या काळातील एक जिवंत तोफगोळा आढळून आला. मीरा-भाईंदर पोलीस आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दल म्हणजेच एनएसजी यांच्या संयुक्त पथकाने तातडीने कारवाई करत हा तोफगोळा सुरक्षितपणे निकामी केला.

उत्तनमध्ये जुन्या काळातील जिवंत तोफगोळा आढळला

■भाईंदर। प्रतिनिधी,

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन परिसरात मंगळवारी जुन्या काळातील एक जिवंत तोफगोळा आढळून आला. मीरा-भाईंदर पोलीस आणि राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दल म्हणजेच एनएसजी यांच्या संयुक्त पथकाने तातडीने कारवाई करत हा तोफगोळा सुरक्षितपणे निकामी केला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मिरा भाईंदर शहरातील एक मोठी दुर्घटना टळली असून संपूर्ण कारवाईदरम्यान कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही.

उत्तन परिसरातील जमिनीत गाडलेला एक संशयास्पद धातूचा गोळा स्थानिक नागरिकांना आढळून आला होता. नागरिकांनी याबाबात तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपासणी केली असता, ती साधी वस्तू नसून अविस्फोटित स्फोटक सामग्री असण्याची शक्यता समोर आली. मंगळवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास विशेष तांत्रिक प्रक्रियेद्वारे हा तोफगोळा निकामी करण्यात आला. तपासादरम्यान ही सामग्री अविस्फोटित स्फोटक असल्याचे स्पष्ट झाले.

सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून ही मोहीम फत्ते करण्यात आली. क्षमता विकास उपक्रमांतर्गत नुकतेच मीरा-भाईंदर पोलिसांना आयईडी आणि विविध प्रकारच्या स्फोटकांची ओळख पटवण्याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते, अशी माहिती एनएसजी अधिकाऱ्यांनी दिली.

'झुरळां'चे २० जूनपासून बेमुदत आंदोलन

प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी, आज पुण्यात निदर्शने

नीट परीक्षेतील गोंधळ आणि पेपरफुटी संदर्भात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास वीस जूनपासून दिल्लीत बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशारा कॉकरोच जनता पाटीर्ने दिला आहे. या आंदोलनाची सुरुवात गुरुवारी पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठापासून होणार असून, त्यानंतर लखनऊ, अमृतसर, जयपूर आणि बिहार यांसारख्या शहरांमध्येही आंदोलने केली जातील.

अमेरिकेत परत जाणार नाही

- पुण्याच्या आंदोलनाला दिल्लीतील आंदोलनापेक्षा अधिक प्रतिसाद मिळेल. जेलमध्ये जाण्याचीही आमची तयारी आहे. एकट्या दुकट्याने काही होणार नाही. लाखो विद्यार्थी बोलतील, तेव्हाच सरकारपर्यंत आवाज पोहोचेल, असा विश्वासही दीपके यांनी व्यक्त केला.
- यापुढे देशात राहणार की अमेरिकेत, असा प्रश्न केला असता मी यापुढे देशातच राहणार आहे. अमेरिकेला परत जाणार नाही. अमेरिकेत मी नोकरी करून स्थायिक होणार होतो. परंतु पक्षाचे काही हितचिंतक साथीदार होते, त्यांनी ही चळवळ पुढे नेण्याचे ठरवले. त्यामुळे हा निर्णय घेतला, असे उत्तर त्यांनी दिले.



■पुणे। प्रतिनिधी,

नीट परीक्षेतील गोंधळ आणि पेपरफुटी संदर्भात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास वीस जूनपासून दिल्लीत बेमुदत आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशारा कॉकरोच जनता पाटीर्ने दिला आहे. या आंदोलनाची सुरुवात गुरुवारी पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठापासून होणार असून, त्यानंतर लखनऊ, अमृतसर, जयपूर आणि बिहार यांसारख्या शहरांमध्येही आंदोलने केली जातील.

पुण्यात बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना संघटनेचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी सरकारला इशारा दिला की, जर धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला नाही, तर येत्या २० जून रोजी देशभरातील तरुण दिल्लीत एकत्र येतील आणि राजीनामा घेतल्याशिवाय परत जाणार नाहीत.

मला व कुटुंबाला जीवे मारण्याच्या धमक्मया येत आहेत. माझे सोशल मीडिया अकाऊंट हॅक केले, अकाऊंट बंद केले. कॉक्रोचना मारण्यासाठी हीट आणून ठेवले आहे, अशी भाषा केली जात आहे. मात्र, घाबरण्याचे कारण नाही. तुमचा आवाज कुणीही दाबू शकत नाही. माझी विद्यार्थ्यांच्या पालकांना विनंती आहे, की कुणीही आपल्या मुलांना रोखू नये. आपल्या भविष्यासाठी शांततेच्या मार्गाने लढण्याचा त्यांना अधिकार आहे. त्यामुळे त्यांचा आवाज दडपू नका, असे आवाहन त्याने पालकांना उद्देशून केले.

आम्ही कोणत्याही राजकीय पक्षाला सोबत घेणार नाही. तथापि, विद्यार्थी हिताच्या मुद्यावर आम्हाला राजकीय पक्ष पाठिंबा देऊ शकतात. खरे तर कॉक्रोच जनता पार्टी ही चळवळच आहे. आमच्या आंदोलनास परदेशातून अर्थसहाय्य मिळत असल्याचा कांगावा करून दहशतवादी प्रवृत्तीकडून मदत घेतली जात असल्याचा अपप्रचार केला जात आहे, असे नमूद करतानाच लवकरच आमच्या मूव्हमेंटच्या नियुक्त्या केल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

बीडमध्ये मोठी दुर्घटना! गोदावरीत भाविकांची बोट उलटली... 3 महिलांचा मृत्यू

मृत आणि जखमींची माहिती

या अपघातात प्रणीला शेषराव राठोड (वय ५५ वर्ष, रा. लोणार, जि. बुलढाणा) नावाच्या महिलेचा बुडून मृत्यू झाला. तर काही वेळातच दुसऱ्या एका अज्ञात महिला भाविकाचा मृतदेह देखील पाण्यातून बाहेर काढण्यात आला. याशिवाय, सिंधुबाई अर्जुन मावळे (वय ७५ वर्ष, रा. महागाव, जि. वाशीम) या वृद्ध महिलेला बेशुद्ध अवस्थेत पाण्यातून बाहेर काढण्यात आले असून, त्यांना माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याचे पोलिसांनी सांगितले.



■माजलगाव। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीच्या पात्रात भाविकांनी भरलेली एक बोट उलटल्याची धक्कादायक घटना बुधवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत दोन महिला भाविकांचा बुडून मृत्यू झाला असून एका वृद्ध महिलेची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना बोटीत बसवल्यामुळे हा अपघात झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

माजलगाव तालुक्यापासून साधारण २० किमी अंतरावर असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी हे भाविक जात होते. सध्या पवित्र 'अधिक मास' सुरू असल्याने या ठिकाणी दर्शनासाठी आणि गोदावरी स्नानासाठी महाराष्ट्रभरातून तसेच देशभरातून लाखो भाविकांची गर्दी होत आहे. नदी ओलांडून पलीकडच्या काठावर असलेल्या मंदिरात जाण्यासाठी भाविक बोटीचा वापर करतात. बुधवारी सकाळीही नदीकाठी प्रचंड गर्दी झाली होती. याच गदीर्चा फायदा घेऊन स्थानिक बोट चालकांनी अधिक नफा कमवण्यासाठी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोट चालकाने बोटीच्या वास्तविक क्षमतेपेक्षा कित्येक पटीने जास्त प्रवाशांना बोटीत कोंबले होते. ही ओव्हरलोड झालेली बोट गोदावरीच्या भर पात्रात पोहोचली, तेव्हा वजनाचा समतोल बिघडल्याने बोट उलटली. यामुळे बोटीतील पुरुष, महिला आणि लहान मुले खोल पाण्यात फेकले गेले. भाविकांचा आक्रोश ऐकून नदीकाठच्या स्थानिक मच्छीमार आणि तरुणांनी तात्काळ गोदावरी पात्रात उड्या घेतल्या आणि भाविकांना सुखरूप बाहेर काढले.

गोंदियात भीषण दुर्घटना... बोट उलटल्याने २ तरुणांचा बुडून मृत्यू

■गोंदिया। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात बीड, खेड आणि गोंदिया येथे पाण्यात बुडाल्याने सात जणांचा मृत्यू झाला. यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील बोदल जलाशयातील दुर्घटनेने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. फिरायला गेलेल्या नऊ मित्रांच्या गटातील दोन तरुणांचा बोट उलटल्याने बुडून मृत्यू झाला, तर सात जणांना स्थानिक मच्छीमारांनी वाचवले.

मिळालेल्या माहितीनुसार, तिरोडा तालुक्यातील बरबसपुरा गावातील ९ युवक संध्याकाळी बोदल जलाशय परिसरात फिरण्यासाठी आले होते.



तलावाजवळ फोटो काढल्यानंतर त्यांनी मच्छीमारांच्या बोटीतून नौकाविहार करण्याचा निर्णय घेतला. मात्र, जलाशयाच्या मध्यभागी पोहोचताच अचानक बोट पलटी झाली आणि सर्वजण पाण्यात पडले.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली. जीव वाचवण्यासाठी युवकांनी आरडाओरडा सुरू केला. आवाज ऐकताच स्थानिक मच्छीमारांनी तातडीने बचावकार्य हाती घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळे सात जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र, मोहित वसंत रहांगडाले आणि कुणाल शालिकराम भोडे (रा. बरबसपुरा) या दोन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तिरोडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मृतदेह बाहेर काढून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

ठाणे पोलिसांची मोठी कारवाई!


पाकिस्तानमधून येणारे ३ कोटींचे ड्रग्ज जप्त... काश्मीरमधील दोन तस्कर अटकेत

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे गुन्हे शाखेने अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई करत पाकिस्तानशी संबंधित आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ रॅकेटचा पदार्फाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ३ कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले असून काश्मीरमधील दोन सराईत तस्करांना अटक केली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने कळवा येथील खारेगाव परिसरात सापळा रचून ही कारवाई केली. आरोपींकडून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये २ किलो २० ग्रॅम चरस आणि १२ हजार ९७४ ट्रामेडोल कॅप्सूल यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या अंमली पदार्थांची किंमत ३ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे.



तपासात या रॅकेटचे धागेदोरे थेट पाकिस्तान आणि जम्मू-काश्मीर यांच्याशी जोडलेले असल्याचे समोर आले आहे. हे संपूर्ण जाळे कुपवाडा भागातून कार्यरत होते. पाकिस्तानमधून सीमा ओलांडून हे अंमली पदार्थ प्रथम काश्मीरमध्ये आणि त्यानंतर ठाणे व मुंबई परिसरात पुरवले जात होते. या प्रकरणात फिरोज खान आणि मोटू फुलायचे या दोन मुख्य तस्करांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना १२ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सांगलीत गोळीबाराचा थरार... कामगार नेत्याच्या घरावर गोळ्या झाडल्या, गुन्हेगारांनी निर्दोष 14 वर्षाच्या नातवाला संपवलं

■सांगली। प्रतिनिधी,

सांगली शहरामध्ये खंडणीच्या वादातून एका 14 वर्षीय मुलाचं डोक्यात गोळी झाडून खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. वेदांत बंडगर असं मृतक अल्पवयीन मुलाचं नाव आहे. वेदांत याच्या डोक्यात गोळी झाडून त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. सराईत गुन्हेगारांनी हे कृत्य केल्याचं समोर आलं आहे. वेदांत बंडगर याचे आजोबा बाळू बंडगर हे कामगार नेते असल्याची माहिती समोर येत आहे. बाळू बंडगर आणि त्यांचे थोरात नामक साथीदार यांच्याकडे खंडणी मागण्यासाठी सांगलीतील एक सराईत गुन्हेगार गेला होता. या गुन्हेगाराने जतमध्ये राहणाऱ्या थोरात नामक व्यक्तीच्या घरामध्ये घुसून खंडणी मागितली होती. घरात घुसून खंडणी मागितल्याने सराईत गुन्हेगाराविरुद्ध तक्रार देण्यासाठी बाळू बंडगर आणि त्यांचे साथीदार थोरात हे दोघे जत



पोलीस ठाण्यात गेले होते. याचा राग सराईत गुन्हेगाराच्या मनामध्ये होता.

सराईत गुन्हेगाराने याच रागातून गुरुवारी सकाळी जतमध्येच बंडगर आणि थोरात या दोघांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. पण तोपर्यंत त्याचा डाव फसला. त्यानंतर तो सांगली शहरातील अभयनगर परिसरामध्ये असणाऱ्या बंडगर यांच्या घरामध्ये गेला. यावेळी बाळू बंडगर यांचा नातू वेदांत बंडगर हा घराबाहेर मोबाईलवर गेम खेळत असताना सराईत गुन्हेगाराने पाहिले. या गुन्हेगाराने यावेळी मागचापुढचा कुठलाही विचार न करता 14 वर्षाच्या वेदांतच्या डोक्यामध्ये गोळ्या झाडून त्याची हत्या केली.

सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमधील टेंडर घेण्याच्या वादातून तसेच थोरात यांच्याकडून खंडणी मागण्याच्या वादातून हा प्रकार झाल्याचे समोर येत आहे. सराईत गुन्हेगाराने पाच ते सात जणांच्या मदतीने ही हत्या केली. त्याच्या मागावर स्थानिक गुन्हे शाखा, संजयनगर पोलिसांची वेगवेगळी पथके रवाना करण्यात आली आहेत. तरुणाची हत्या केल्या प्रकरणी सांगलीत एकच खळबळ उडाली आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

एक षडयंत्र : लव्ह जिहाद

आजच्या काळात कॉलेज, नोकरीची ठिकाणे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून नातेसंबंध निर्माण होतात. अशा वेळी भावनिक फसवणूक, दबाव किंवा चुकीच्या हेतूने होणाऱ्या वागणुकीपासून सावध राहणे आवश्यक आहे. प्रत्येकाने परस्पर सन्मान, विश्वास आणि योग्य माहितीच्या आधारावरच नातेसंबंध पुढे नेणे गरजेचे आहे.

हिंदू मुलींना फसवून प्रेमाच्या जाळ्यात ओढायचे, त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवून त्याचे व्हिडीओ शूटिंग करायचे आणि त्याद्वारे तिला ब्लॅकमेल करायचे. निकाह करण्यासाठी तिचे बलपूर्वक धर्मांतर करायचे, तिच्याद्वारे अनेक मुले जन्माला घालायची, अशा पद्धतीचे लव्ह जिहादचे जाळे संपूर्ण भारतात पसरले आहे. आजतागायत देशभरात अशा स्वरूपाच्या हजारो तक्रारी पोलीस ठाण्यात प्रवीष्ट करण्यात आल्या आहेत. लाखो हिंदू मुली या षडयंत्राला बळी पडून आपले सर्वस्व गमावून बसल्या आहेत. ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडूंपासून, आयएएस ऑफिसर्स, डॉक्टर्स, वकील, अभिनेत्रीसुद्धा आहेत. लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींना नंतर आखाती देशांमध्ये विकले जाते, त्यांचा आतंकवादी कारवायांसाठी वापर केला जातो किंवा त्यांच्या अवयवांची तस्करी केली जाते असेही सप्रमाण सिद्ध झाले आहे. या सर्वांना विरोध करणाऱ्या मुलींचे मृतदेह पुढे सुटकेसमध्ये, फ्रीजमध्ये, रस्त्यालगत सापडतात. अशी कितीतरी प्रकरणे महाराष्ट्रातही घडली आहेत. लव्ह जिहादची भयावहता दर्शवणारा 'दि केरला स्टोरी' आणि त्याचा सिक्वेल असे दोन चित्रपट येऊन गेले. लव्ह जिहादला बळी पडलेल्या मुलींची आपबिती सांगणारे अनेक व्हिडीओज आज युट्यूबवर उपलब्ध आहेत. लव्ह जिहादचा धोका ओळखून उत्तर प्रदेश सरकारने सर्वप्रथम राज्यात लव्ह जिहादविरोधी कायदा करून त्याद्वारे कारवाई सुरू केली. हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्रातही बलपूर्वक धर्मांतरबंदी कायदा करण्यात आला. लव्ह जिहाद नावाच्या धर्मांध षडयंत्रामध्ये केवळ तरुण मुलेच नाहीत, तर मुलीही सहभागी असल्याचे 'दि केरला स्टोरी' चित्रपटातून आपण पाहिले, आता त्याचा प्रत्यक्ष पुरावा समोर आला आहे. उत्तर प्रदेशमधील शामली जिल्ह्यातील एका कोट्यधीश व्यावसायिकाला एका मुसलमान जिम ट्रेनरने प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याचे धर्मांतर केल्याचे प्रकरण नुकतेच समोर आले आहे. शामली जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष देवराज मलिक हे जिल्ह्यातील एक नावाजलेले प्रसिद्ध व्यावसायिक आहेत. त्यांचा एकुलता एक मुलगा आयुष मलिक याने बी-फार्माचे शिक्षण घेतले आणि तो स्वतःचे मेडिकल चालवत आहे. ५ वर्षांपूर्वी त्याने राहत्या ठिकाणाजवळील 'कुरेशी प्लस' नावाच्या जिममध्ये जाण्यास सुरुवात केली. कोट्यधीश असलेल्या आयुषला तेथील जिम ट्रेनर चांदणी कुरेशी हिने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. ४ वर्षांपूर्वी तिने छुप्या पद्धतीने त्याचे धर्मांतर करून 'रहेमान' असे नाव ठेवले आणि त्याच्याशी निकाह केला. याबाबत आयुष याच्या घरच्यांना काहीच कल्पना नव्हती. मागील ६ महिन्यांपासून आयुषच्या वागण्यात अचानक परिवर्तन जाणवू लागले. त्याने दाढी वाढवली, कुर्ता पायजमा आणि डोक्यावर गोल टोपी घालून तो दुकानात बसू लागला इतकेच नव्हे तर मशिदीत जाऊन दिवसातून पाच वेळा नमाज पढू लागला. या संदर्भातील व्हिडीओज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर हिंदू संघटनांनी जिम ट्रेनर चांदणी कुरेशीच्या घरासमोर निदर्शने केली. आयुषचे वडील देवराज मलिक यांनी शनिवारी रात्री शामली पोलीस ठाण्यात धाव घेऊन चांदणी कुरेशी आणि तिच्या कुटुंबाच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्याची दखल घेत पोलिसांनी चांदणी आणि तिच्या घरातील सहा सदस्य, तीन मौलवी यांच्याविरोधात जबरदस्तीने धर्मांतर करणे, खंडणी उकळणे आणि जीवे मारण्याची धमकी देणे या गुन्ह्याखाली गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली. ज्या भारतभूमीत पूर्वी सोन्याचा धूर निघत होता, अशा समृद्ध आणि सुखसंपन्न भारतात यवनी आक्रमक आले आणि त्यांनी भारताचे सारे वैभव लुटले, येथील पुरातन मंदिरे पाडली, त्यावर मशिदी उभारल्या, येथील संस्कृतीच्या खुणा पुसल्या, तलवारीच्या बळावर धर्मांतरे घडवून आणली. बायाबापड्यांवर अत्याचार केले, त्यांना जनानखान्यात डांबले. येथील शूरवीर योद्धांनी यवनी आक्रमकांचा कडाडून विरोध केला. पुढे आलेल्या इंग्रजांनीही भारताचे उरले-सुरले वैभव लुटले. घरादारांवर तुळशीपत्र ठेवून आपल्या देशभक्त क्रांतिकारकांनी त्यांना भारत सोडण्यास भाग पाडले. सर्व प्रकारच्या पारतंत्र्यापासून भारत मुक्त झाला, मात्र आपला धर्म वाढवण्याचे मनसुबे बाळगणारी धर्मांध पिलावळ आजसुद्धा या देशात वळवळते आहे. लव्ह जिहाद, थुंक जिहाद, लँड जिहाद, कॉर्पोरेट जिहाद यांसारखे अनेक जिहाद विविध क्षेत्रांत पाय रोवून बसले आहेत. मिळेल तिथे सावज शोधताहेत. हिंदूंचा वंशविच्छेद करण्यासाठी आणि आपला धर्म वाढवण्यासाठी त्यांनी लव्ह जिहादसारखे षडयंत्र आणले आहे, ज्याद्वारे भोळ्याभाबड्या हिंदू मुलींना जाळ्यात अडकवले जात आहे. पालक आपल्या मुलीला प्रेमाने वाढवतात, तिला चांगले शिक्षण देतात आणि तिचे सुरक्षित व सुखी भविष्य घडावे अशी त्यांची इच्छा असते. वयात आल्यानंतर ती आपला जोडीदार स्वतः निवडते तेव्हा काही वेळा पालकांना स्वीकारणे कठीण जाते, पण योग्य संवादातून अनेक गोष्टी स्पष्ट होऊ शकतात. मात्र काही प्रसंगी तरुणी किंवा तरुण हे भावनिक फसवणूक, दिशाभूल किंवा चुकीच्या संबंधांमुळे अडचणीत येऊ शकतात. अशा वेळी संपूर्ण कुटुंबाला मानसिक त्रास होतो. त्यामुळे पालक आणि मुलांमध्ये विश्वास, संवाद आणि समजूतदारपणा असणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या काळात सोशल मीडिया आणि इतर माध्यमांमुळे संबंध अधिक जलद तयार होतात, त्यामुळे तरुणांनी कोणत्याही नात्यात घाई न करता योग्य विचार, सुरक्षितता आणि परस्पर सन्मान याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच पालकांनीही भीती किंवा संशयाऐवजी संवाद आणि मार्गदर्शनावर भर द्यावा. समाजातील प्रत्येक व्यक्तीने कोणत्याही प्रकारच्या शोषणापासून तरुणांचे संरक्षण करणे, तसेच कायद्याच्या चौकटीत राहूनच अशा प्रश्नांकडे पाहणे आवश्यक आहे. पोटच्या मुलीला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेली, लाडाप्रेमाने वाढवलेली मुलगी कोणाच्या तरी फसव्या प्रलोभनांना फसते आणि आई-वडिलांना झुगारून धर्मपरिवर्तन करते, हे कोणत्याही आई-वडिलांच्या काळजावर घाव करणारेच आहे. मात्र आपली लाडकी मुलगी एका जिहादी संकटाला बळी पडली असून तिच्या आयुष्याची पुरती फरफट झाल्याचे ऐकून त्या आई-बापाचे हृदय पिळवटून निघते. देशभरातील अशा लाखो मुली या षडयंत्राला बळी पडल्या आहेत. माध्यमांसमोर येऊन आपली व्यथा मांडण्याचे धाडस सर्वांमध्ये नसते. त्यापैकी काही निमूटपणे अन्याय सहन करतात, तर काही कुंटणखाना हेच आपले घर मानून प्रतिदिन मरणयातना सहन करतात. लव्ह जिहादच्या षडयंत्रात आता धर्मांध मुलींचाही वापर केला जाऊ लागला आहे. महाविद्यालये, कॉर्पोरेट ऑफिसेस यांसारख्या ठिकाणी या आपले सावज शोधत असतात. श्रीमंत मुले हे त्यांचे प्राधान्य असते. याआधीही अशा प्रकारची प्रकरणे समोर आली आहेत. आज लव्ह जिहाद दारापर्यंत येऊन ठेपला आहे. उद्या तो आपल्या घरातही येऊ शकतो; यासाठी प्रत्येक हिंदू मुलीनेच नव्हे, तर मुलांनी आणि त्यांच्या पालकांनी सतर्क राहायला हवे!

हरित ऊर्जेसाठी उपयुक्त संशोधन



हवामानबदल आणि जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्वामुळे पर्यावरणीय संकट तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर ह्यग्रीन हायड्रोजनह्न हा स्वच्छ ऊजेर्चा महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे येत असून भारताने २०३० पर्यंत ५० लाख टन उत्पादनाचे लक्ष्य ठेवले. याच संदर्भात आयआयटी गुवाहाटीतील वैज्ञानिकांनी विकसित केलेले नवे कोटिंग तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरते.

भारतात ऊर्जा, पर्यावरण आणि विकास या तिन्ही विषयांशी संबंधित प्रश्नांचा संगम ज्या एका विषयात दिसतो, तो म्हणजे 'ग्रीन हायड्रोजन'. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा विषय केवळ वैज्ञानिक परिषदांपुरता मर्यादित होता; परंतु आज तो जागतिक राजकारण, अर्थकारण आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. अशा वेळी 'आयआयटी' गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या नव्या तंत्रज्ञानाने संशोधन क्षेत्रातच नव्हे, तर भारताच्या ऊर्जा भविष्याबाबतही नव्या आशा निर्माण केल्या आहेत. पाण्यापासून स्वच्छ हायड्रोजन तयार करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान, टिकाऊ आणि परिणामकारक बनवणे, हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून संशोधन करण्यात आले. साध्या भाषेत सांगायचे, तर सूर्यप्रकाश आणि पाणी यांच्या साहाय्याने स्वच्छ इंधन तयार करण्याच्या दिशेने भारताने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. हे केवळ तांत्रिक प्रगतीचे उदाहरण नाही, तर भविष्यातील ऊर्जा राजकारणात भारताला स्वतंत्र ओळख मिळवून देणारी शक्यता आहे.

आज जग ऊर्जा संकटाच्या नव्या टप्प्यावर उभे आहे. गेल्या दोन शतकांपासून औद्योगिक विकासाचा पाया कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांवर उभा राहिला; परंतु या इंधनांनी जगाला विकास दिला, तितकाच पर्यावरणीय संकटाचाही वारसा दिला. हवामानबदल, वाढते तापमान, वितळणारे हिमनग, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्राची वाढती पातळी हे सारे परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागले आहेत. याच कारणामुळे जग स्वच्छ ऊर्जेकडे वळत आहे.

सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, विद्युत वाहने आणि हरित हायड्रोजन हे नव्या ऊर्जा व्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ मानले जात आहेत. यात हरित हायड्रोजनला विशेष महत्त्व दिले जात आहे, कारण ते दीर्घकालीन ऊर्जा साठवण, जड उद्योग आणि वाहतूक क्षेत्रासाठी प्रभावी पर्याय ठरू शकते. भारतासाठी हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. कारण भारत जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा ग्राहकांपैकी एक आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे आणि त्याच वेगाने ऊर्जा गरजाही वाढत आहेत. आज भारत आपल्या तेलाच्या गरजांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाच्या किमतीतील चढउतारांचा थेट परिणाम होतो. रशिया-युक्रेन युद्धानंतर जगाने ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व नव्याने अनुभवले. तेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर अवलंबून राहण्याचे धोके स्पष्ट झाले.

त्यामुळे अनेक देशांनी स्वदेशी आणि स्वच्छ ऊर्जा स्रोतांकडे लक्ष केंद्रित केले. भारतासाठी 'ग्रीन हायड्रोजन' हे त्याच धोरणात्मक बदलाचे प्रतीक आहे. 'आयआयटी' गुवाहाटीच्या संशोधनाचे महत्त्व इथेच वाढते. कारण ग्रीन हायड्रोजनची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्याच्या उत्पादनाचा खर्च आणि कार्यक्षमता. आज उपलब्ध तंत्रज्ञान महागडे आहे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादनासाठी पुरेसे कार्यक्षम नाही. त्यामुळे ग्रीन हायड्रोजन अजूनही पारंपरिक इंधनांशी स्पर्धा करू शकत नाही. गुवाहाटीतील वैज्ञानिकांनी विकसित केलेली नवी कोटिंग प्रणाली या समस्येवर उपाय शोधण्याचा प्रयत्न करते.

आयआयटी गुवाहाटीच्या वैज्ञानिकांनी अशी रचना तयार केली आहे, ज्यामुळे पाण्याचे विघटन अधिक प्रभावी पद्धतीने होते. विशेषतः प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारे गॅस बुडबुडे इलेक्ट्रोडवर चिकटून राहू नयेत, यासाठी त्यांनी विशेष हायड्रोजेल थर विकसित केला आहे. त्यामुळे प्रक्रिया अधिक वेगाने आणि सातत्याने चालते. याचा अर्थ कमी वेळेत अधिक हायड्रोजन तयार होऊ शकतो. म्हणजेच उत्पादनाचा खर्च कमी होण्याची शक्यता वाढते. हे तंत्रज्ञान पुढे व्यावसायिक पातळीवर यशस्वी झाल्यास ग्रीन हायड्रोजन अधिक व्यवहार्य बनू शकते; परंतु या संशोधनाचे महत्त्व केवळ ऊर्जा उत्पादनापुरते मर्यादित नाही. त्यातून भारतातील संशोधन व्यवस्थेची क्षमतादेखील अधोरेखित होते.

अनेकदा भारतावर 'तंत्रज्ञान आयात करणारा देश' अशी टीका केली जाते; परंतु अंतराळ, औषधनिर्मिती, डिजिटल तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञानाप्रमाणेच ऊर्जा क्षेत्रातही भारतीय संशोधन संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, हे या संशोधनातून स्पष्ट होते. एक महत्त्वाचा प्रश्न मात्र येथे उपस्थित होतो, तो म्हणजे भारत संशोधनाला पुरेसे प्राधान्य देतो का? विकसित देशांच्या तुलनेत भारताचे संशोधनावरील खर्चाचे प्रमाण अजूनही कमी आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये उत्कृष्ट प्रतिभा असूनही निधी, पायाभूत सुविधा आणि उद्योगांशी समन्वय या बाबतीत मर्यादा आहेत. अनेक संशोधन प्रकल्प प्रयोगशाळेपलीकडे जाऊ शकत नाहीत. 'ग्रीन हायड्रोजन'सारख्या क्षेत्रात ही दरी कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हे तंत्रज्ञान भविष्यातील अर्थव्यवस्थेचा पाया बनू शकते.

भविष्यात स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञान असणारे देशच जागतिक स्पर्धेत पुढे राहतील. त्यामुळे संशोधनाकडे केवळ शैक्षणिक उपलब्धी म्हणून न पाहता, राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. भारत सरकारने राष्ट्रीय हरित हायड्रोजन अभियान सुरू करून योग्य दिशेने पाऊल टाकले आहे; परंतु हे अभियान यशस्वी होण्यासाठी संशोधन, उद्योग आणि धोरण या तिन्ही घटकांमध्ये समन्वय आवश्यक आहे. उद्योगक्षेत्राने संशोधन संस्थांशी अधिक जवळून काम केले पाहिजे. तसेच सरकारने दीर्घकालीन गुंतवणूक आणि धोरणात्मक स्थिरता दिली पाहिजे. 'ग्रीन हायड्रोजन'चे आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे ग्रामीण आणि विकेंद्रित ऊर्जा व्यवस्था.

भारतातील अनेक भाग अजूनही स्थिर आणि स्वच्छ ऊर्जा पुरवठ्यापासून वंचित आहेत. भविष्यात लहान प्रमाणावर 'ग्रीन हायड्रोजन' उत्पादन शक्य झाले, तर ग्रामीण भागात ऊर्जा स्वावलंबनाचे नवे मॉडेल तयार होऊ शकते. शेतकरी, लघुउद्योग आणि दुर्गम भागांसाठी ही मोठी क्रांती ठरू शकते. याचबरोबर 'ग्रीन हायड्रोजन' भारताच्या औद्योगिक धोरणालाही नवी दिशा देऊ शकते. स्टील, सिमेंट, खत आणि रसायन उद्योग हे कार्बन उत्सर्जनाचे मोठे स्रोत आहेत. या क्षेत्रांमध्ये ग्रीन हायड्रोजनचा वापर वाढवल्यास भारत औद्योगिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधू शकतो; मात्र या सर्व शक्यतांसोबत काही कठोर वास्तवही आहेत.

'ग्रीन हायड्रोजन'साठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छ वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. भारतासारख्या देशात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमण करताना संसाधनांचा समतोल वापर महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच तंत्रज्ञानाची किंमत कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान राहणार आहे; पण इतिहास सांगतो, की सुरुवातीला महाग वाटणारे तंत्रज्ञान पुढे जाऊन सर्वसामान्य बनते. सौर ऊर्जेचे उदाहरण समोर आहे. काही वर्षांपूर्वी सौर ऊर्जा अत्यंत महाग मानली जात होती. आज ती अनेक ठिकाणी सर्वात स्वस्त ऊर्जा स्रोत ठरत आहे. 'ग्रीन हायड्रोजन'बाबतही अशीच शक्यता आहे. यासाठी दीर्घकालीन दृष्टी आवश्यक आहे. ऊर्जा संक्रमण ही एका दिवसात घडणारी प्रक्रिया नाही. ती दशकांमध्ये आकार घेते.

भारताने आजपासूनच संशोधन, पायाभूत सुविधा आणि कौशल्य विकास यांवर लक्ष केंद्रित केल्यास पुढील दोन-तीन दशकांमध्ये तो 'ग्रीन हायड्रोजन' क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवू शकतो. 'आयआयटी' गुवाहाटीचे संशोधन या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. हे संशोधन भारताला केवळ स्वच्छ ऊर्जा देणार नाही, तर नव्या आर्थिक संधी, औद्योगिक प्रगती आणि तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरता यांचाही मार्ग मोकळा करू शकते. आजच्या काळात ऊर्जा हा केवळ आर्थिक प्रश्न राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सुरक्षेशीही जोडला गेला आहे. ऊर्जा स्रोतांवर नियंत्रण असणारे देशच जागतिक राजकारणात प्रभावी ठरतील. त्यामुळे 'ग्रीन हायड्रोजन'मध्ये गुंतवणूक करणे म्हणजे भविष्यातील सामरिक शक्तीत गुंतवणूक करणे होय.

आकाशी झेप घे रे पेपरा!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा कंदील दाखवला तर येत्या २१ जून रोजी होणाऱ्या 'नीट-यूजी' फेरपरीक्षेसंदर्भात एक आगळेवेगळे दृश्य देशवासी बघू शकतील : या फेरपरीक्षेच्या प्रश्नपत्रिका देशाचे शक्तिशाली हवाई दल वाहून नेत आहे असे. तसे एक आगळेवेगळे दृश्य गुरुवारी देशाने पाहिलेच. या फेरपरीक्षेसंदर्भातील बैठक केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाल्याचे ते दृश्य. वास्तविक या परीक्षेची जबाबदारी धर्मेंद्र प्रधान यांच्या नेतृत्वाखालील शिक्षण मंत्रालयाची. त्यामुळे त्याबाबतची बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली होणे उचित; मात्र ती झाली संरक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली. मुळात या फेरपरीक्षेचे नियंत्रणच पंतप्रधान मोदी यांनी स्वतःकडे घेतल्याचे वृत्त आहे. त्यावरून या फेरपरीक्षेबाबत केंद्र सरकार किती गांभीयार्ने विचार करीत आहे, हे स्पष्ट होते आणि शिक्षणमंत्र्यांच्या कर्तृत्वाबाबत पंतप्रधानांच्या मनात काही किंतु निर्माण झाला असावा का, या शंकेस बळकटी मिळते. या फेरपरीक्षेच्या प्रश्नपत्रिकांना नको तिथे पाय फुटून पुन्हा एकदा अवसानघात होऊ नये, म्हणून हवाई दलाच्या साह्याने प्रश्नपत्रिकांची वाहतूक करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. खुद्द पेपर सेट करणाऱ्यांनी तो परीक्षेच्या तब्बल १७ दिवस आधी फोडला होता. तो मोबाइलमधून वितरित झाला; कुठल्या वाहनातून नव्हे. पैशांचा हव्यास सुटलेले खासगी कोचिंग क्लास व व्यवस्थेतील भ्रष्टांचे साटेलोटे आणि अर्थातच यश 'विकत' घेण्याची विद्यार्थ्यांची-पालकांची तयारी यांनी घडवलेला हा प्रताप आहे. त्यामुळे हे गैरप्रकार रोखायचे तर, भ्रष्टाचाराची कीड मुळापासून नष्ट करणे गरजेचे. त्याचबरोबर, परीक्षेच्या स्वरूपातच आमूलाग्र बदल करणेही तेवढेच गरचेचे झालेले आहे. पुढील वर्षापासून ही परीक्षा संगणकआधारित घेण्याचा निर्णय स्वागतार्हच. मात्र हा असा सगळा पट असूनही हवाई दलाची मदत परीक्षेसाठी घेणे पंतप्रधान मोदी यांनी मान्य का करावे, हा प्रश्न आहे. येथे प्रश्न हवाई दलाच्या क्षमतेचा नाही. ती क्षमता बिनतोडच आहे. पण कुठल्या कामासाठी कुठल्या यंत्रणा वापरायच्या याचे काही एक औचित्य असते. विशेषतः हवाई दलासारखी एखादी सेवा जेव्हा येते तेव्हा तर औचित्याचा प्रश्न अधिकच ठळक होतो. या औचित्याचा विचार व्हायलाच हवा. केंद्रातील मोदी सरकार तो करेल, ही अपेक्षा.

एक शेवटचा प्याला विषाचा

पुण्यात विषारी दारूने २०पेक्षा अधिक बळी घेतल्याने खळबळ उडाली आणि नेमाने समोर येणारे तेच ते प्रश्नही पुन्हा समोर आले. हा विषारी प्याला फाटक्या, गरीब वर्गापर्यंत पोचूच नये, यासाठी पुरेशा गांभीयार्ने प्रयत्न व्हायला हवेत.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी दारूमुळे वीसहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभर पुन्हा एकदा हातभट्टी-गावठी दारू आणि दारूबंदीचा प्रश्न चर्चेत आला आहे. प्रत्येक वेळी अशी दुर्घटना घडते, चौकशा होतात, कारवाया होतात, काही अधिकारी निलंबित होतात आणि काही दिवसांत सगळे पूर्वपदावर येते. मात्र, विषारी दारूमुळे होणाऱ्या मृत्यूंच्या या साखळीला कायमचा पूर्णविराम मिळत नाही. गरीब आणि कष्टकरी वर्गच पुन्हा पुन्हा या दुर्घटनांचा बळी ठरताना दिसतो.

पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये घडलेल्या ताज्या दुर्घटनेने पुन्हा एकदा अस्वस्थ करणारे असे अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. शहराच्या हद्दीपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर हातभट्टीची दारू तयार होत असते, ती विकली जाते, ग्राहकांपर्यंत पोहोचते आणि त्यानंतर मृत्यूंची मालिका सुरू होते. एवढे सारे घडत असताना, त्याआधी प्रशासन काय करत होते? स्थानिक पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभाग आदी यंत्रणांना या प्रकारांची माहिती नव्हती का? की माहिती असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले? हे प्रश्न आत्ता विचारले जात आहेत. हे असेच प्रश्न याआधी घडलेल्या अशा दुर्घटनांचेवेळीही विचारले गेले आहेत. मात्र, त्याची उत्तरे ना प्रशासनाकडून मिळतात, ना सरकारकडून मिळतात.

विषारी दारूमुळे घडणाऱ्या दुर्घटनांमध्ये काही गोष्टी कायम समान दिसतात. मृत्युमुखी पडणारे बहुसंख्य लोक हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असतात. झोपडपट्ट्या, कामगार वस्त्या, औद्योगिक भाग आणि ग्रामीण परिसर हे या दुर्घटनांचे केंद्रबिंदू असतात. अनेकजण रोजंदारीवर काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, रिक्षाचालक किंवा स्थलांतरित कामगार असतात. स्वस्तात नशा मिळावी म्हणून ते हातभट्टीची किंवा गावठी दारू विकत घेतात. परवानाधारक दुकानातील मद्याच्या तुलनेत ती कितीतरी पटींनी स्वस्त असते. पण त्यामागे गुणवत्ता नियंत्रण नसते, रासायनिक तपासणी नसते आणि उत्पादन प्रक्रियेवर कोणतेही नियमन नसते. परिणामी, अशी काही दुर्घटना घडल्यास एका रात्रीत कुटुंबच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. घरातील कर्ता पुरुष जातो, मागे पत्नी, मुले आणि वृद्ध आई-वडील राहतात. त्यावर काही काळ चर्चा होते; मात्र काही दिवसांनी हा विषय सार्वजनिक चचेर्तूनही नाहीसा होतो.

दुर्घटना नित्याच्याच

देशात कुठे ना कुठे विषारी दारू प्राशन केल्याने लोकांनी जीव गमावल्याच्या घटना सतत घडत असतात. त्यातील काही ठळकपणे स्मरणात राहतात. सन १९८१ मध्ये कर्नाटकच्या बेंगळुरूमध्ये घडलेली दुर्घटना आजही सर्वांत भीषण घटनांपैकी एक मानली जाते. विषारी दारू प्यायल्याने तेथील ३००पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाला होता. सन २००४ मध्ये विक्रोळी येथील दारू दुर्घटनेत १०४ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर हातभट्टी अड्डयांवर मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्या. अनेक गुन्हे दाखल झाले. इतके होऊनही सन २०१५ मध्ये मुंबईच्या मालवणी परिसरात विषारी दारूमुळे १०६ जणांचा मृत्यू झाला. लक्ष्मीनगर झोपडपट्टीतील कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. अनेकांनी आपली दृष्टी गमावली. तपासात मिथेनॉलयुक्त दारू विकली गेल्याचे समोर आले. आता पुणे-पिंपरी चिंचवडमध्ये पुन्हा त्याच प्रकारची दुर्घटना घडली आहे. प्रश्न असा आहे की, चार दशकांत शेकडो मृत्यू होऊनही आपण या संकटातून काही शिकलो आहोत का?

महाराष्ट्राप्रमाणेच इतर राज्यांमध्येही विषारी दारूचे संकट कायम आहे. पंजाबमध्ये २०२० मध्ये शंभराहून अधिक जणांचा मृत्यू झाला. गुजरातमध्ये दारूबंदी असूनही वेळोवेळी अशा घटना घडत राहतात. बिहारमध्ये दारूबंदीनंतर अनेक सामूहिक मृत्यूंच्या घटना समोर आल्या आहेत. बिहार, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, कर्नाटक आणि पश्चिम बंगालमध्येही अशा दुर्घटना वेळोवेळी घडल्या आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. हा प्रश्न केवळ एखाद्या राज्यापुरता मर्यादित नाही. तो संपूर्ण देशासमोरील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय आव्हान आहे.

दुर्घटनांनंतरची ठरलेली 'स्क्रिप्ट'

प्रत्येक मोठ्या दुर्घटनेनंतर प्रशासनाची प्रतिक्रिया जवळपास सारखीच असते. सर्वप्रथम गुन्हे दाखल होतात. संशयितांना अटक होते. हातभट्टी अड्डयांवर छापे टाकले जातात. उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांची संयुक्त मोहीम सुरू होते. काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होते. मृतांच्या कुटुंबीयांना मदत जाहीर केली जाते. पुढे विशेष तपास पथके स्थापन होतात. चौकशी समित्या नेमल्या जातात. काही आठवड्यांपर्यंत हा विषय चर्चेत राहतो. मात्र, काही महिन्यांनंतर सगळे शांत होते आणि पुन्हा अवैध दारूचे अड्डे सुरू होतात. यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. दुर्घटनेनंतरची कारवाई महत्त्वाची आहेच; पण दुर्घटना होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना का प्रभावी ठरत नाहीत?

अवैध दारूचा व्यवसाय हा केवळ काही व्यक्तींचा उद्योग नसतो. त्यामागे एक यंत्रणा कार्यरत असते. कच्चा माल पुरवणारे, दारू तयार करणारे, वाहतूक करणारे, विक्रेते, एजंट आणि स्थानिक पातळीवरील संरक्षण देणारे घटक यांची साखळी त्यामागे असते. लाखो रुपयांची उलाढाल या व्यवसायातून होत असते. दारूवर मोठ्या प्रमाणात कर असल्याने अधिकृत मद्य महाग असते. त्याउलट हातभट्टीची दारू स्वस्त मिळते. त्यामुळे ग्राहकांचा ओढा कायम राहतो. जोपर्यंत मागणी आहे, तोपर्यंत पुरवठाही सुरू राहणार, हे वास्तव आहे.

गावठी दारू तयार करण्यासाठी प्रामुख्याने गूळ, मळी, साखर कारखान्यांचे उपपदार्थ, धान्य किंवा इतर सेंद्रिय पदार्थ वापरले जातात. हे पदार्थ मोठ्या ड्रममध्ये आंबवले जातात. त्यानंतर उष्णतेच्या साहाय्याने त्यातून अल्कोहोलयुक्त वाफ तयार केली जाते. ही वाफ थंड करून द्रवरूपात गोळा केली जाते. हीच प्राथमिक स्वरूपातील दारू असते. नियमित मद्यनिर्मिती कारखान्यांमध्ये ही प्रक्रिया वैज्ञानिक पद्धतीने होते. गुणवत्ता नियंत्रणासाठी प्रयोगशाळा असतात. मात्र हातभट्टी अड्डयांवर कोणतेही नियंत्रण नसते.

मिथेनॉलचा घातक वापर

दारू उत्पादन प्रक्रियेतील सर्वात धोकादायक टप्पा म्हणजे भेसळ. अधिक नशा व्हावी, उत्पादन खर्च कमी व्हावा आणि नफा वाढावा यासाठी काही उत्पादक मिथेनॉलसारखी रसायने दारूत मिसळतात. काही वेळा उत्पादन प्रक्रियेतील त्रुटींमुळेही मद्य तयार करताना मिथेनॉलसदृश विषारी द्रव तयार होते. मिथेनॉल हे औद्योगिक वापरासाठी असलेले अल्कोहोलच आहे. ते सहजी व स्वस्तात मिळू शकते. त्यामुळे होणारी नशा झटपट होत असल्याने कमी दारूमध्ये नशेचा अंमल चढतो. मात्र ते मानवी शरीरासाठी विषासमान आहे. मिथेनॉल शरीरात गेल्यानंतर डोळ्यांच्या नसांवर परिणाम होतो. सुरुवातीला डोकेदुखी, चक्कर, मळमळ, उलट्या अशी लक्षणे दिसतात. त्यानंतर अंधत्व येऊ शकते. उपचार न झाल्यास मूत्रपिंड, यकृत आणि मेंदू निकामी होऊन मृत्यू होऊ शकतो. म्हणूनच विषारी दारूच्या अनेक दुर्घटनांमध्ये मृत्यू होण्यापूर्वी रुग्णांची दृष्टी जाण्याच्या घटना समोर येतात.

दारूबंदी हा उपाय आहे का?

पुण्यातील ताज्या दुर्घटनेनंतर पुन्हा एकदा दारूबंदीचा मुद्दा चर्चेत आला आहे. महाराष्ट्रात सध्या गडचिरोली आणि वर्धा या दोन जिल्ह्यांमध्ये दारूबंदी लागू आहे. मात्र तेथील वास्तव वेगळे चित्र दाखवते. वर्ध्यात १९७४ पासून दारूबंदी आहे. पण स्थानिक पातळीवर अवैध दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी कायम असतात. गडचिरोलीतही दारूबंदी असूनही बाहेरून दारूची तस्करी आणि हातभट्टीचे प्रकार पूर्णपणे थांबलेले नाहीत. यामुळे दारूबंदी म्हणजे प्रश्नाचे अंतिम उत्तर नाही, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे.

दुसरीकडे दारूबंदी समर्थकांचे म्हणणे आहे की, त्यामुळे मद्यसेवनाचे प्रमाण कमी होते आणि सामाजिक दुष्परिणाम कमी होतात. वास्तव पाहता दारूबंदीबरोबर कठोर अंमलबजावणी आणि सामाजिक परिवर्तन यांची जोड आवश्यक असल्याचे दिसते. आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रशासन यांनी एकत्र येऊन व्यसनमुक्तीबाबत व्यापक मोहीम राबविण्याची गरज आहे. पुणे-पिंपरी चिंचवडमधील दुर्घटना ही केवळ एका भागातील शोकांतिका नाही. ती राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेला, दारू धोरणाला आणि समाजाला पडलेला प्रश्न आहे.

चार दशकांत शेकडो नागरिकांचा बळी गेला. प्रत्येक वेळी चौकशा झाल्या, कारवाया झाल्या, आश्वासने दिली गेली. पण, विषारी दारूमुळे होणारे मृत्यू थांबले नाहीत. जोपर्यंत अवैध दारूचे अर्थकारण मोडून काढले जात नाही, जोपर्यंत स्थानिक पातळीवरील संगनमतावर कारवाई होत नाही आणि जोपर्यंत व्यसनमुक्तीला प्राधान्य दिले जात नाही, तोपर्यंत अशा दुर्घटना पुन्हा घडत राहतील. प्रश्न दारूबंदीचा आहे की नाही, यावर मतभेद असू शकतात. मात्र, एक गोष्ट निर्विवाद आहे, ती म्हणजे विषारी दारूमुळे होणारे मृत्यू हे अपघात नसतात; ते यंत्रणेच्या अपयशातून घडणारे टाळता येण्याजोगे मृत्यू असतात. म्हणूनच प्रत्येक दुर्घटनेनंतर केवळ शोक व्यक्त करून चालणार नाही, तर या मृत्यूंच्या मूळ कारणांवर प्रामाणिकपणे घाव घालावा लागणार आहे.

डोळ्यात कचरा गेल्यावर करा 'हे' उपाय

डोळे हे मानवी शरीरातील एक महत्त्वाचे ज्ञानेंद्रिय. डोळे हा अतिशय महत्त्वाचा आणि नाजूक अवयव असल्यामुळे त्याकडे विशेष लक्ष द्यावं लागतं. धूळ, माती, प्रदूषके यांच्यामुळे डोळ्यांना इजा पोहोचू शकते. वातावरणातील धूलिकण डोळ्यात गेल्यानंतर डोळ्यांची जळजळ होणे, त्यातून पाणी येणे, डोळ्यात खुपणे असे अनेक त्रास संभवतात. त्यामुळे घरातून बाहेर पडताना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनेक वेळा प्रवासादरम्यान डोळ्यामध्ये माती किंवा कचरा जातो. अथक प्रयत्न केल्यानंतरही डोळ्यात गेलेला कचरा काढणं शक्य होत नाही. अशावेळी काही सोप्या पद्धतीने आपण डोळ्यात गेलेला कचरा काढू शकतो.

- सुती कापड पाण्यामध्ये भिजवावे. या ओल्या कापडाने डोळ्यांच्या कडा हलक्याशा दाबाव्यात. फक्त हा दाब देत असताना डोळ्यामधील कोणत्याही जागेवर जोर पडणार नाही याकडे लक्ष द्यावे.
- डोळ्यात धूळ गेल्यास डोळ्यावर हळूवार फुंकर मारावी.
- डोळ्यांवर गार पाणी शिंपडावे किंवा एका बशीत पाणी घेऊन १-२ सेकंदासाठी त्यात डोळा उघडझाप करावा. हे करत असताना डोळ्यात पाणी जातं मात्र घाबरू नये.
- डोळ्यात काही गेल्यावर त्या क्षणी डोळ्यांची उघडझाप करावी. जेवढ्या लवकर तुम्ही ही कृती कराल तेवढा डोळ्यातील कचरा दूर होण्याची शक्यता जास्त असते.
- अनेक वेळा पापण्यांवर धूळ साचते, अशावेळी डोळ्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पापण्या खालच्या पापण्यांवर ठेवाव्यात आणि डोळ्यांची हळूहळू उघडझाप करावी.



केस आणि त्वचेसाठी औषधी तेल



सध्या केसांच्या समस्या वाढताना दिसताहेत. प्रदूषणाचं प्रमाण वाढत असताना केस आणि त्वचेवर त्याचा स्पष्ट परिणाम दिसतो. मात्र केसांवर अधिक परिणाम दिसण्याची अनेक कारणं आहेत. सध्या केसांचं सौंदर्य आणि स्वच्छता राखताना अनेक रसायनयुक्त प्रसाधनांचा वापर वाढतोय. दर्जा न बघता खरेदी केलेली अशी प्रसाधनं केसांच्या मुळांनाच हात घालतात. तीव्र प्रसाधनांमुळे केसांची मुळं कमकुवत होतात, केसांचा पोत बिघडतो आणि तक्रारींची मालिका सुरू होते. यावर उपाय म्हणून आठवड्यातून एकदा किंवा दोनदा तेलाचा मसाज करणं हा पर्याय आहे. यामुळे केसांचं आरोग्य सुधारतं, त्याचप्रमाणे डोकेही शांत राहतं. पण केवळ तेल पुरेसं नाही. काही उपायानं हे तेल अधिक उपयुक्त बनवता येऊ शकतं.





- तिळाच्या तेलात मेथीदाणे भिजत घाला. आता हे तेल मंद आचेवर गरम होऊ द्या. तेल गार झाल्यावर गाळून मेथीदाणे बाजूला करा. आता हे तेल अधिक औषधी आणि परिणामकारक आहे.
- केसांसाठी आवळ्याची उपयुक्तता आपण जाणतो. आवळे उकळवा. आता हे मऊसर आवळे कूकरमध्ये ठेवून चार-पाच शिट्या करा. आवळ्याचा गर निघेल. हा गर गाळून घ्या. आता या मिश्रणात हवं ते तेल एकत्र करा आणि अर्धा तास गरम करा. थंड झाल्यावर तेल बाटलीत भरून ठेवा. या तेलानं केलेला मसाज अधिक चांगला परिणाम देईल.
- सुकलेला आवळा तेलात मिसळा. तेल उकळू द्या. थंड झाल्यावर आवळ्यासहित तेल बाटलीत भरा.
- खोबरेल तेलात बदाम मिसळा आणि तेलाला चांगली उकळी येऊ द्या. उकळी आल्यानंतर तेलाचा रंग बदलेल. रंग बदलल्यावर तेल आचेवरून उतरवा आणि थंड झाल्यावर बाटलीत भरून ठेवा.
- खोबरेल तेलात मेथीदाणे घालून चार-पाच दिवस तसेच ठेवा. त्यानंतर गाळून तेल बाटलीत घाला. हे तेल अधिक उपयुक्त झालेलं असेल.

प्रत्येक रुग्णाला हे पाचही उपचार केलेच पाहिजेत, असे आवश्यक नाही. रुग्णाची प्रकृती, आतापर्यंत झालेली मोठमोठी आजारपणे, वय, कुठला ऋतू सुरू आहे या सर्वांचा विचार करून वैद्य रुग्णाला नेमका कुठला उपचार द्यायचा हे ठरवतात. पंचकर्मामध्ये वात, पित्त आणि कफ या तीन दोषांचे शोधन करायचे असते.

वात, पित्त व कफ हे तीन दोष संतुलित असतील तर कोणताही रोग होत नाही. मात्र यांच्यापैकी एखादाही दोष वाढला असेल, तर शरीरात रोग निर्माण होत असतो. हे तीन दोष वाढण्याच्यादेखील वेगवेगळ्या श्रेणी असतात. त्यानुसार उपचार निश्चित केला जातो. साधारणतः अन्न पचन न होणे, तोंडाला चव नसणे, स्थूलपणा, ॲनिमिया, जडत्व, अंग गळून जाणे, अंगावर पित्त उठणे, सर्वांगास कंप सुटणे, सर्व अंग जखडणे, कामात लक्ष न लागणे, अतिशय आळस येणे, थोडे श्रम करताच दम लागणे, अकारण अशक्तपणा येणे, सर्वांगास दुर्गंधी येणे, वारंवार कफ होणे, वारंवार

पंचकर्म म्हणजे काय?

पंचकर्म ही आयुर्वेदाची एक वैशिष्ट्यपूर्ण चिकित्सा आहे. प्राचीन भारतीय शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली ही उपचार पद्धती आहे. यामध्ये रोग बरा करण्यासाठी एखादे औषध देऊन शरीरातच तो रोग जिरवून न टाकता तो रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे रोग समूळ नष्ट होतो. अर्थात तो रोग पुन्हा डोके वर काढत नाही व रोग समूळ नष्ट होतो. अशा रीतीने रोग शरीरातून बाहेर काढून टाकण्याच्या प्रक्रियेला शोधन क्रिया म्हटले जाते. मात्र त्याचबरोबरच बृहन, लंघन, स्नेहन, रुक्षण, स्वेदन व स्तंभन हे सहा उपक्रमही केले जातात. परंतु पंचकर्म उपचारात वमन, विरेचन, बस्ती, नस्य व रक्तमोक्षण हे प्रमुख व अत्यंत महत्त्वाचे असे उपचार आहेत.



पित्त होणे, निद्रानाश किंवा अतिशय झोप येणे, नपुंसकता येणे, वाईट स्वप्ने पडणे, शरीराचा वर्ण काळवंडणे ही लक्षणे दिसली तर पंचकर्म उपचार देणे अतिशय लाभकारक असते.

पंचकर्म उपचार करताना रोग्याची शक्ती पाहिली जाते. हे उपचार सोसण्याची ताकद रुग्णामध्ये असली पाहिजे. वात, कफ व पित्त हे तीन दोष शरीरात वाढले असतील. सर्व शरीरात पसरले असतील व ते साम अवस्थेत असतील तर ते दोष वाढलेले असूनदेखील पंचकर्माद्वारे तसेच्या तसे बाहेर काढता येत नाहीत. साम अवस्थेतील रोग्याचे शोधन केल्यास रोग्याला अधिक त्रास होण्याची शक्यता असते. यासाठी पाचन, स्नेहन व स्वेदन हे तीन पूर्व उपचार केले जातात व तद्नंतर पंचकर्म उपचार केले जातात.

वैद्यांनी सांगितलेले पथ्य व इतर सूचनांचे पालन करणे शक्य नसेल, तर पंचकर्म करू नये आणि स्वतःच्या मनाने तर अजिबात करू नये. पंचकर्म उपचारांचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून काही सूचना लक्षात ठेवल्या पाहिजेत.

अतिशय मोठ्या आवाजात बोलू नये. कुठल्याही वाहनाने प्रवास करू नये. जास्त चालू-फिरू नये. एकाच जागी जास्त बसून वा पडून राहू नये, अति खाणे किंवा अजीर्ण टाळावे. वैद्यांनी सांगितलेलाच आहार घ्यावा आणि ब्रह्मचर्याचे पालन करावे.

पंचकर्माने रोग शरीरातून समूळ नष्ट होतो. परंतु काही इतरही याचे फायदे आहेत. शरीरात अग्नी प्रदिप्त होतो. शरीराला व मनाला स्वस्थता मिळते. इंद्रिये प्रसन्न होतात. मन व बुद्धी आपापल्या कार्यांमध्ये उत्कर्ष करतात. शरीराचा वर्ण व कांती उजळते. त्वचा तजेलदार दिसू लागते. कार्यशक्ती म्हणजे स्टॅमिना वाढतो. शरीर पुष्ट व भारदार होते.



वृद्धावस्था लवकर येत नाही. संतती नसलेल्यांना संततीप्राप्ती होते. निरोगी अवस्थेत दीर्घायुष्य मिळते. पंचकर्म उपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखालीच घ्यावा, त्याने दुष्परिणाम होत नाहीत. हे सर्व फायदे मिळवायचे असतील तर पंचकर्म उपचार वर्षातून किमान एकदा तरी करून घेतलाच पाहिजे.

पावसाळ्यात पाणी पिताना अशी घ्या काळजी...

दूषित पाण्यातून पावसाळ्यात आणि एरवीही अनेक आजार पसरतात. विशेषतः पावसाळ्यामध्ये घरात अशुद्ध पाणी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा, डायरिया असे आजार उद्भवतात. या आजारांपासून लांब राहण्यासाठी पाणी निर्जंतुक व स्वच्छ असणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी २४ तास पाणी उपलब्ध नसते, तिथे तर हे उपाय जास्तच फायदेशीर ठरतात. तेव्हा घरच्या घरी पाणी स्वच्छ करण्याच्या काही खास पद्धती...

पाणी गाळून घेणे

वॉटर प्युरिफायरमध्ये पाणी गाळले जाते. त्याचप्रमाणे स्वच्छ कापड किंवा अतिशय बारीक जाळीची गाळणीने पाणी गाळून घेतल्यास ते स्वच्छ होते. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात या पद्धतीचा हमखास वापर करावा. मी चांगल्या सोसायटीमध्ये राहतो, त्यामुळे आमच्याकडे चांगले पाणी येते, असे वाटत असले तरीही पाणी कायम गाळून मगच प्यावे.



उकळणे

पाण्याच्या दोन प्रकारच्या दुष्टीपासून आपण आपली काळजी घेतली पाहिजे. भौतिकदृष्ट्या पाणी दुष्ट होते ते म्हणजे कचरा, माती, गाळ इत्यादी आणि जीव-जंतूंनी पाणी दुष्ट होते. हा अतिशय धोकादायक प्रकार. भौतिक दुष्टी आपण पाणी गाळून, तुरटी फिरवून घालवू शकतो, पण जीवजंतूंच्या दुष्टीमध्ये पाणी उकळून घेणे जास्त सोयीस्कर आहे. उकळल्यामुळे पाण्यातील जीवजंतू मरून जातात आणि पाणी शुद्ध होते. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत कुटुंबातील सर्वांनी उकळलेले पाणी प्यावे. (पाण्याला उकळी फुटल्यानंतर पाणी १०-१५ मिनिटे उकळावे. नंतरच गॅस बंद करावा. पाणी पुरेसे उकळणे गरजेचे आहे.)

तुरटी फिरवणे

तुरटी फिरवून पाणी शुद्ध करणे ही अतिशय पारंपरिक पद्धत आहे. भरलेल्या पाण्याच्या भांड्यात तुरटी फिरवल्यास पाण्यातील गाळ खाली बसतो आणि पाणी स्वच्छ होते. मात्र तुरटी फिरवली असली तरीही हा पाणी स्वच्छ करण्याचा म्हणावा तितका खात्रीशीर उपाय नसल्याने हे पाणी गाळून आणि उकळूनच प्यावे.

नळाला फिल्टर बसवणे

पावसाळ्याच्या दिवसात नळाला काहीसे मातकट आणि अशुद्ध पाणी येते. त्यामुळे हे पाणी भरतानाच काही प्रमाणात स्वच्छ व्हावे यासाठी नळाला कापड बांधावे किंवा गाळणे लावावे. याशिवाय हल्ली बाजारात नळाला लावण्यात येणारे वेगवेगळे फिल्टर्स उपलब्ध असतात. त्यांचा वापरही फायदेशीर ठरू शकतो. यामुळे पाण्यातील सौम्य प्रकारच्या जंतूंचा धोका कमी होण्यास मदत होते.

चीज पिज करी



साहित्य: १ कप वाफवलेले मटार, २ चीज क्युब्ज, लहान तुकडे, ३ टेस्पून तेल, ३ टेस्पून कांदा, बारीक चिरून, १/२ कप टॉमेटो, बारीक चिरून, ३/४ कप ब्राऊन ग्रेव्ही (आधी तयार करून ठेवावी), १/२ कप काजू-मगजबी पेस्ट (आधी तयार करून ठेवावी), दिड टिस्पून लसूण पेस्ट, १/२ टिस्पून आले पेस्ट, १ टिस्पून गरम मसाला, २ टेस्पून खवा किंवा १ टेस्पून मिल्क पावडर, १/२ टिस्पून लाल तिखट, १/३ कप पाणी, २ टिस्पून बटर, चवीपुरते मीठ

कृती: काजू-मगजबी पेस्ट करण्यासाठी १/४ कप काजू आणि १/४ कप मगजबी पाण्यात घालून उकळवावे. नंतर पाणी काढून टाकावे आणि बारीक पेस्ट करावी. कढईत तेल गरम करावे. त्यात कांदा लालसर होईस्तोवर परतावा. नंतर आले-लसूण पेस्ट परतावी. टॉमेटो घालून एकदम मेण होईस्तोवर परतावा. वाफवलेले मटार घालून मिक्स करावे. १-२ मिनिटे परतून ब्राऊन ग्रेव्ही, काजू पेस्ट आणि गरजेपुरते पाणी घालावे. मंद आचेवर ५ मिनिटे शिजू द्यावे. गरम मसाला, खवा, लाल तिखट, बटर, आणि मीठ घालावे. मंद आचेवर ४-५ मिनिटे शिजवावे. सर्व्ह करताना चीजचे बारीक तुकडे घालून मिक्स करावे. लगेच सर्व्ह करावे.

नारळाचे तेल : त्वचेसाठी वरदान

नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असते.



कित्येक शतके आपण परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली, यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्ये देखील बदल करण्याची गरज आहे.



यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.

- नारळाचे तेल हे केवळ केसांसाठी नव्हे तर आपल्या त्वचेकरिता देखील वरदान आहे. याच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडिकल्सचे परिणाम नाहीसे होतात.
- खोबरेल तेलामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.
- नारळाचे तेल उत्तम मॉईश्चरायझर आहे. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते.
- नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढवण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, टाचांवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटवण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.



जाणून घ्या हे बदामाचे १० फायदे

- सकाळी भिजवलेले बदाम खाल्ले तर त्यात औषधी गुणधर्म जास्त असतात. कोरड्या बदामापेक्षा पाण्यात भिजवून खाल्लेले बदाम जास्त पौष्टिक असतात.
- बदामांच्या सेवनाने सर्दी आणि पडसे कमी होते. रात्री झोपताना भिजवलेले बदाम आणि गरम दूध घेतले तर सर्दी कमी होते.
- बदामाने काही काळ भूक भागवली जाते.
- डाएटिंग करणारे लोक अधिक प्रमाणात बदाम खातात. डाएटिंग करणारे भूक लागल्यास इतर पदार्थांपेक्षा १२ बदाम खातात. हे बारा बदाम एका ब्रेकफास्टचे काम करतात.
- बदामामुळे पोषक द्रव्ये मिळतात आणि कॅलरीजही वाढत नाहीत.
- मधुमेह झालेल्या व्यक्तींनी बदाम खाल्ल्यास त्यांची शुगर लेव्हल नियंत्रणात राहते.
- बदामाची साल कोरडी असल्याने सहसा लोक ती काढून टाकतात. पण ही साल शरीरातील रक्त पातळी वाढवण्यास मदत करते. म्हणून बदाम हे सालासकट खाल्ले पाहिजेत.
- बदामामध्ये तांब्याचे प्रमाण जास्त असते, जे रक्त शुद्धीकरण करण्यास उपयुक्त ठरते.
- बदामामुळे कोरड्या त्वचेचा स्निग्धपणा वाढण्यास मदत होते.
- बदामाच्या सेवनाने केस गळण्याचे प्रमाणही कमी होते.

लहान मुलांमधील वाढता लठ्ठपणा ठरतोय नैराश्याचं कारण

वयाच्या सातव्या वर्षी जर तुमचं मूल लठ्ठ असेल तर ही धोक्याची घंटा आहे. कारण वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्याला नैराश्य गाठू शकतं. लठ्ठ मुलांमध्ये अकारण चिंता तसंच भावनिक असंतुलन यांसारख्या मानसिक समस्या आढळून येत असल्याचं यूकेमधील एका अभ्यासामधून समोर आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्य या दोन्ही गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या असतात, असं लिव्हरपूल येथील संशोधकांना आढळून आलं आहे. मुलं जशी मोठी होतात, तशा या समस्याही वाढत असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे.

ज्या मुलींचा BMI (Body Mass Index) आवश्यकतेपेक्षा अधिक असतो, अशा मुलींना मुलांच्या तुलनेत नैराश्य लवकर ग्रासतं. या समस्येमागची नेमकी कारणं काय आहेत, हे शोधण्याचा प्रयत्न मात्र संशोधनातून झाला नाही. लठ्ठपणा आणि मानसिक आजार या दोन्हीमागे दारिद्र्य हा एक घटक असल्याचं मत संशोधनातून मांडण्यात आलं आहे.

लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर केलेल्या या संशोधनातले निष्कर्ष हे ग्लास्गोमध्ये होणाऱ्या EuropeanCongress on Obesity मध्ये सादर करण्यात येतील. संशोधकांनी २००० ते २००२ या वर्षांत यूकेमध्ये जन्मलेल्या १७ हजारांहून अधिक मुलांची माहिती गोळा करून त्याचं विश्लेषण केलं. संशोधकांनी गोळा केलेल्या माहितीमध्ये मुलांची उंची आणि वजन यासोबतच त्यांना वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेडसावणाऱ्या भावनिक समस्यांची माहिती घेतली.



वयाच्या तिसऱ्या, पाचव्या, सातव्या, अकराव्या आणि चौदाव्या वर्षी या मुलांचं वर्तन नेमकं कसं होतं, याची माहिती पालकांकडूनच घेण्यात आली होती. सातव्या वर्षापासून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा एकमेकांशी असलेला संबंध उघड व्हायला सुरुवात होते. त्यापूर्वी या दोन्हींमधला संबंध स्पष्टपणे दिसून येत नाही. आमच्या संशोधनातून लठ्ठपणा आणि भावनिक समस्यांचा संबंध स्पष्ट झाला, असं लिव्हरपूल युनिव्हर्सिटीमधील मानसशास्त्राचे व्याख्याता डॉ. शार्लेट हार्डमन यांनी स्पष्ट केलं.

लठ्ठपणाच्या समस्येनं ग्रासलेल्या मुलांवर उपचार करणाऱ्यांसाठी ही नवीन माहिती उपयुक्त आहे. 'बऱ्याचदा लोकांना असं वाटतं की कमी खाल्लं आणि अधिक व्यायाम केल्यावर काहीच त्रास होणार नाही. पण हे इतकं सोपं नाहीये.' 'वयाच्या सातव्या वर्षापासून ही मुलं लठ्ठपणा आणि मानसिक आजाराच्या दुष्टचक्रात अडकतात,' असं डॉ. हार्डमन सांगतात. लहान मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येणाऱ्या या समस्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण मोठेपणीही आरोग्यावर याचे दुष्परिणाम दिसून येतात.

'फार्मा सही दाम' ॲप वापरा आणि स्वस्तात औषधे मिळवा

'फार्मा सही दाम' हे एक असं ॲप, जे ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

औषधांच्या वाढत्या बिलांचा तुम्हालाही त्रास होत असेल, तर तुमच्यासाठी ही बातमी दिलासा देणारी आहे. कारण केंद्र सरकारने नुकतेच 'फार्मा सही दाम' नावाचे ॲप लाँच केले आहे, ज्यामुळे ग्राहकांना ब्रँडेड औषधांप्रमाणे गुणकारी औषधे कमी दरात मिळण्यास मदत होणार आहे. हे ॲप नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटीने विकसित केले असून ते अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही वापरकर्ते वापरू शकतात. ग्राहकांना स्वस्तात समान दर्जाच्या ब्रँडेड औषधांना पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी हे ॲप सुरू करण्यात आले आहे. म्हणजेच ॲपच्या मदतीने महागड्या औषधांना स्वस्त पर्याय मिळू शकतो.

ॲप कसे काम करते?

जर तुमच्या डॉक्टरांनी तुमच्या आजारासाठी ब्रँडेड औषध लिहून दिले असेल तर तुम्ही ॲपच्या मदतीने त्याचा स्वस्त पर्याय शोधू शकता. यासाठी तुम्हाला ॲपमध्ये औषधाचे नाव टाइप करावे लागेल. मग ते तुम्हाला ब्रँडेड औषधांच्या स्वस्त पर्यायांची संपूर्ण यादी दाखवेल, जे तुम्ही कुठूनही खरेदी करू शकता. हे लक्षात ठेवा की, ही औषधे वेगवेगळ्या नावांनी उपलब्ध असू शकतात, परंतु औषधाची क्रिया सारखीच राहील. या औषधांचे औषधी गुणधर्मही तेच राहतील आणि त्यांची क्रियाही तिच असेल. तर सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न केला तर उदाहरण म्हणून 'ऑगमेंटिन' हे भारतात सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या औषधांपैकी एक आहे. या ब्रँडेड औषधाच्या १० गोळ्यांची किंमत सुमारे २०० रुपये आहे. पण या ॲपमध्ये तुम्हाला या औषधाचे किमान १० पर्याय सापडतील, जे त्यापेक्षा खूपच स्वस्त आहेत. या गोळ्या ८-१० रुपयांना विकत घेता येतील. त्याचप्रमाणे पॅन डीच्या १५ कॅप्सूलची किंमत १९९ रुपये आहे आणि त्याच फॉर्म्युल्यासह दुसऱ्या औषधाच्या १० कॅप्सूल केवळ २२ रुपयांना विकत घेता येतील.

केंद्र सरकारचा वाटा महत्त्वाचा

भारतातील औषधांची किंमत ही इतर वस्तूंप्रमाणे मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. मात्र, ३३ टक्क्यांहून अधिक औषधांच्या किमतींवर सरकारचे नियंत्रण आहे. म्हणजेच या औषधांच्या किमती मनमानी वाढवता येणार नाहीत. नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग ॲथॉरिटी (NPPA) ने अत्यावश्यक औषधांची यादी तयार केली आहे आणि त्यांच्या किमतींवर नियंत्रण ठेवले आहे. ड्रग प्राइस कंट्रोल ऑर्डर (DPCO) अंतर्गत ३५५ औषधांच्या आणि त्यांच्या ८८२ फॉर्म्युलेशनच्या किमती भारतात निश्चित केल्या गेल्या आहेत.

मुंबईसह राज्यभरात हाय अलर्ट

अनेक महत्वाची कार्यालये बॉंबने उडवण्याची धमकी

महाराष्ट्रातील नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) मुख्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि मुंबई व पुणे महानगरपालिकांच्या महापौर कार्यालयांना बुधवारी बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारे ईमेल आल्याने खळबळ उडाली आहे.



■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

महाराष्ट्रातील नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) मुख्यालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि मुंबई व पुणे महानगरपालिकांच्या महापौर कार्यालयांना बुधवारी बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारे ईमेल आल्याने खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर काही ठिकाणी तातडीने परिसर रिकामा करण्यात आला असून सुरक्षा यंत्रणांनी शोधमोहीम हाती घेतली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांना आलेल्या एका ईमेलमध्ये महाल भागातील आरएसएस मुख्यालय आणि रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृती भवन येथे स्फोटके ठेवल्याचा दावा करण्यात आला होता. या धमकीमुळे पोलिसांची चांगलीच पळापळ झाली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेलाही राज्यातील विविध महत्त्वाच्या ठिकाणी स्फोट घडवून आणण्याचा इशारा देणारे ईमेल आले आहेत. यामध्ये महापौर कार्यालय आणि मुख्यमंत्री कार्यालयाचा समावेश आहे. महापालिकेच्या अनेक अधिकृत ईमेल आयडीवर हे ईमेल आल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी तत्काळ तपास सुरू केला आहे.

कथित खलिस्तानवाद्यांचा इमेल

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या ईमेलमध्ये महापौर कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई शेअर बाजार इमारत आणि महापालिका कार्यालयांमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली आहे. या ईमेलमध्ये 'खलिस्तान'चा उल्लेख असून विविध संस्थांना लक्ष्य करणारा प्रक्षोभक मजकूर आहे. दुपारी १:११ वाजता मुंबई महापौर कार्यालयाजवळ आयईडी स्फोटकांनी भरलेली कार वापरून स्फोट घडवला जाईल, असा दावा या ईमेलमध्ये करण्यात आला होता. तसेच बीएसई इमारत, मुख्यमंत्री कार्यालय आणि बीएमसी कार्यालयांमध्येही ठरावीक वेळेत स्फोट घडवण्याची धमकी देण्यात आली होती.

पुणे महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय आणि महापौर कार्यालयालाही असाच बॉम्बचा धमकीचा ईमेल आला. खबरदारी म्हणून महापालिकेची संपूर्ण मुख्य प्रशासकीय इमारत रिकामी करण्यात आली आणि बॉम्ब शोधक पथकाने तिथे कसून तपास केला. स्वतःला 'खलिस्तान नॅशनल आर्मी' म्हणवणाऱ्या एका संघटनेने हा ईमेल पाठवल्याचा संशय आहे. त्यांनी पुणे महापालिका महापौर कार्यालयात दुपारी १:११ वाजता, विधान भवनात दुपारी ३:११ वाजता आणि नागपूरमधील आरएसएस मुख्यालयात दुपारी ३:११ वाजता आयईडी स्फोट मालिका घडवून आणण्याची धमकी दिली होती.

ई-मेलचा शोध सुरू

१९८४ मधील 'ऑपरेशन ब्लूस्टार' आणि 'ऑपरेशन वूडरोझ'ला आरएसएसने पाठिंबा दिला होता, असा दावा या ईमेलमध्ये करण्यात आला असून, याचा 'बदला' घेण्याची आणि भाजप-आरएसएस 'संपवण्याची' भाषा करण्यात आली आहे, असे पोलीस आणि पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. पुणे महापालिका आवारात पुढील आदेश येईपर्यंत नागरिकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच मुंबई आणि पुणे येथील महापालिका मुख्यालये आणि महापौर कार्यालयांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. हे ईमेल नेमके कुठून आले, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे तपास पथक काम करत आहे.

महिला अधिकाऱ्याच्या अंगावर कार घातली

गुटखाविरोधी कारवाईदरम्यानचा धक्कादायक प्रकार

अवैध गुटख्याची वाहतूक करणाऱ्या गाडीवर कारवाई करणाऱ्या पथकातील महिला अधिकाऱ्याला गोळ्या घालण्याची धमकी देत गुटखा माफियांनी स्कॉर्पिओखाली चिरडण्याचा प्रयत्न केला.



■छत्रपती संभाजीनगर। **प्रतिनिधी,**

अवैध गुटख्याची वाहतूक करणाऱ्या गाडीवर कारवाई करणाऱ्या पथकातील महिला अधिकाऱ्याला गोळ्या घालण्याची धमकी देत गुटखा माफियांनी स्कॉर्पिओखाली चिरडण्याचा प्रयत्न केला. ही खळबळजनक घटना सोमवारी रात्री एक वाजेच्या सुमारास वाळूज परिसरातील रहिमपूर गावाच्या हद्दीतील एका कारखान्यासमोर घडली.

अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा प्रमोद सुरसे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार ८ जून रोजी रात्री एकच्या सुमारास रहिमपुर ता. गंगापुर येथील एका कारखान्याच्या समोर आयशर टेम्पो उभा होता.

सदर वाहनाची पथकाने पाहणी केली असता त्यामध्ये प्रतिबंधीत गुटख्याचे जवळपास २५ ते ३० मोठे पोते होते. त्यादरम्यान एक मोटारसायकल तसेच अन्य वाहनांमधून काही इसम वारंवार चकरा मारत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे पोलिस ठाण्यातून संरक्षण मागवले. पण त्याच दरम्यान आरोपींनी थेट कार आपल्या अंगावर घातली असे फियार्दीत म्हटले आहे. त्यानंतर सदर स्कॉर्पिओ गाडीमधील एक इसम आयशर टेम्पोमध्ये बसुन सदर टेम्पो भरधाव वेगाने घेवुन निघुन गेला. त्याचे मागे सदर स्कॉर्पिओ व दोन मोटार सायकल स्वारही निघुन गेले.

'गोळ्या घाला रे...'

अधिकाऱ्यांच्या पथकावर पाळत ठेवून असलेले आरोपी मोबाईलवर कोणाशी तरी बोलत होते. थोड्याच वेळात सदर ठिकाणी काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी आली. गाडीमधील इसमांनी मोठमोठ्याने आरडाओरडा करून पथकाला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी सदर गाडीमधील काहींनी यांना गोळ्या घाला रे... गोळ्या घाला म्हणून मोठमोठ्याने आरडाओरडा केला. सदर स्कॉर्पिओ चालकाने स्कॉर्पिओ गाडी पथकातील तिघांच्या अंगावर घातली. पथकातील तिघेही वेगवेगळ्या दिशेला पळाले. परंतु फिर्यादी प्रज्ञा सुरसे यांना पळता न आल्याने स्कॉर्पिओ चालकाने गाडी पुन्हा वळवून त्यांना ठार मारण्याच्या उद्देशाने अंगावर घालण्याचा प्रयत्न केला.

पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर सहा पादचारी पूल उभारणार



■वसई। **प्रतिनिधी,**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळे जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडणाऱ्या पालघर जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरील अच्छाड ते दहिसर मार्गावर सहा पादचारी उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने निविदा प्रक्रिया सुरु केली आहे. खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्वाचा प्रकल्प मार्गी लागला आहे.

पालघर जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. या महामार्गालगत अनेक गावे व वस्ती असून स्थानिक नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगारांना रस्ता ओलांडताना मोठा धोका पत्करावा लागत होता. अनेक ठिकाणी अपघातांच्या घटनाही घडत असल्याने सुरक्षित पादचारी पुलांची मागणी जोर धरत होती.

या पार्श्वभूमीवर पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा यांनी केंद्रीत रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे सातत्याने पाठपुरावा केला. विविध बैठका, निवेदने आणि पत्रव्यवहाराद्वारे त्यांनी नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा मांडला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 वरील अच्छाड ते दहिसर दरम्यान सहा पादचारी उड्डाणपूल उभारण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. या पुलांचे बांधकाम ईपीसी पद्धतीने करण्यात येणार आहे.

कुठे उभारले जाणार पादचारी पूल?

- तलासरी (395+520)
- निलगिरी हॉटेल परिसर (396+500)
- आंबोली (406+550)
- खानिवडे (466+900)
- बापाने फाटा
- ससुनवघर

या सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे पुलांच्या उभारणीनंतर रस्ता ओलांडणे अधिक सुरक्षित होणार असून अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य

पादचारी पुलांच्या उभारणीमुळे महामार्गालगतच्या गावांतील हजारो नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. विशेषतः शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रोजंदारीसाठी ये-जा करणाऱ्या कामगारांसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. निविदा प्रक्रिया सुरू झाल्याने प्रत्यक्ष कामाला लवकरच गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निर्णयाबद्दल खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत. त्यांच्या मते, नागरिकांच्या सुरक्षेसाठी उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असून भविष्यातही पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी अशाच प्रकारे प्रयत्न सुरू राहतील.

एमआयडीसी कर्ज उभारणी अधिकारात वाढ

राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. भूसंपादनात शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यासाठी तसेच नवीन औद्योगिक प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अतिरिक्त आर्थिक संसाधनांचीआवश्यकता राहणार एमआयडीसीसाठी हा निर्णय घेण्यात आला. एमआयडीसीला पुरंदर विमानतळ जमीन संपादनासाठी हुडकोकडून ६ हजार कोटींचे कर्ज घेण्यास राज्य सरकारने मान्यता आणि शासन हमी दिली आहे. सध्या पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. तसेच राज्यात विविध औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे आणि आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादन सुरू आहे. त्याद्दष्टीने महामंडळाच्या कर्ज उभारणीच्या सध्याच्या मयार्देत वाढ करण्यासाठी या अधिनियमातील तरतुदीमध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेला मान्यता

सध्या असलेल्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या वाढून ४५ होणार



प्रशासकीय विभागांची पुनर्रचना

- कृषि आणि पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यासाय (पदुम) विभागाचे विभाजन करुन कृषि विभाग आणि पदुम विभाग असे दोन स्वतंत्र विभाग होतील.
- सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाचे विभाजन स्वतंत्र सहकार विभाग, पणन विभाग आणि वस्त्रोद्योग विभाग असे तीन स्वतंत्रपणे होईल.
- सामान्य प्रशासन विभागातून स्वतंत्र राजशिष्टाचार विभाग तर गृह विभागातून स्वतंत्र परिवहन विभाग.
- उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाचे विभाजन करुन उद्योग आणि खनिकर्म विभाग, ऊर्जा विभाग आणि कामगार विभाग असे तीन स्वतंत्र विभाग
- महसूल आणि वन विभागाचे विभाजन करुन महसूल विभाग, मदत आणि पुनर्वसन विभाग आणि वन विभाग असे तीन स्वतंत्र विभाग.
- शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे विभाजन करुन शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग असे दोन स्वतंत्र विभाग.

■मुंबई। **प्रतिनिधी,**

राज्याच्या प्रशासकीय कामकाजात गतिमानता आणि सुसूत्रता येण्यासाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यास मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या वाढून ती आता ४५ इतकी होणार आहे. विभागांची पुनर्रचना करताना नवीन पदनिर्मिती केली जाणार नाही. संबंधित विभागातील मंजूर आणि रिक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या विचारात घेऊन ती पदे नवीन निर्माण करण्यात आलेल्या विभागांना मंजूर संख्येनुसार प्रमाणशीर तत्त्वावर वाटप करण्यात येतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' आणि 'ईज ऑफ लिव्हिंग' या संकल्पनेवर भर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागात सुसूत्रता आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होऊन योजनांची अंमलबजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणे शक्य होणार आहे.

कार्यक्षमता सुधारण्यासाठी निर्णय

मंत्रालयात एकाच विभागात दोन अथवा तीन उपविभाग होते. तसे असले तरी विभागांची आस्थापना एकाच विभाग प्रमुखांकडे असते. परिणामी मनुष्यबळाच्या वितरणात अडचणी निर्माण होत असत. त्याचबरोबर उपविभागाचे कामकाजाचे स्वरूप भिन्न असल्याने त्यानुसार उपविभागात स्वतंत्र सचिवामार्फत कामकाज हाताळण्यात येते. त्यामुळे विभागांचे सुसूत्रीकरण करुन कार्यक्षमता सुधारण्यासाठी विभागांच्या विषयांच्या कार्यासनासह पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन विभागांसाठी स्वतंत्र आस्थापना, रोख शाखा आणि नोंदणी शाखा यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांचे विभाजन, नवीन विभागांची निर्मिती, त्यांच्याबाबतची अधिसूचना प्रशासकीय सुधारणा, नाविन्यता , उद्योजकता आणि सुधारणा या उपविभागामार्फत काढण्यात येईल.

किरकोळ वादातून दुहेरी हत्याकांड...

नागपुरात दोन तरुणांची चाकूने भोसकून हत्या



■नागपूर। **प्रतिनिधी,**

उपराजधानी नागपुरातील सक्करदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छोटा ताजबाग परिसरात बुधवारी रात्री दुहेरी हत्याकांडाची धक्कादायक घटना घडली. फळ विक्रीच्या दरावरून झालेल्या वादातून चार आरोपींनी दोन तरुणांवर धारदार चाकूने हल्ला करत त्यांची निर्घृण हत्या केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत तरुण आणि आरोपी हे दोघेही फळ विक्रीचा व्यवसाय करत होते. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी एका गटाने फळांचे दर कमी ठेवले होते. याच कारणावरून गेल्या काही दिवसांपासून दोन्ही गटांमध्ये वाद सुरू होता. बुधवारी रात्री हा वाद पुन्हा उफाळून आला आणि त्याचे रूपांतर हिंसक संघर्षात झाले. मृतांची ओळख आदित्य भोंडवे (वय 25) आणि आदित्य राहुलकर (वय 23) अशी झाली आहे. दोन्ही गटांमध्ये जोरदार बाचाबाची आणि शिवीगाळ सुरू असताना चार आरोपींनी अचानक चाकू काढून आदित्य भोंडवे आणि आदित्य राहुलकर यांच्यावर सपासप वार केले. हल्ला इतका भीषण होता की दोघेही रक्ताच्या थारोळ्यात कोसळले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हत्येनंतर आरोपींनी तात्काळ घटनास्थळावरून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच सक्करदरा पोलिसांसह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. प्राथमिक तपासात मृत आणि आरोपी दोघांचीही गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्याविरोधात नागपूरमधील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्यांची नोंद असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, पोलिसांनी फरार चारही आरोपींची ओळख पटवली असून त्यांना अटक करण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. या दुहेरी हत्याकांडाचा पुढील तपास सुरू आहे.

लग्नाचे आमिष दाखवून २३ वर्षीय तरुणीवर दोन वर्षे अत्याचार

संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

■बीड। **प्रतिनिधी,**

लग्नाचे खोटे आमिष दाखवून एका २३ वर्षीय तरुणीवर गेल्या दोन वर्षांपासून जळगाव आणि धुळे परिसरात शारीरिक व मानसिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी ट्रकचालक शाहीद शेख फारुख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, संशयित सध्या फरारी आहे.

काय आहे प्रकरण?

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही मूळची धुळे येथील रहिवासी असून ती जळगावात एका नातेवाइकाकडे आली होती. याच दरम्यान सुप्रीम कॉलनीतील रहिवासी असलेल्या शाहीद शेख फारुख याची तिच्याशी ओळख झाली. शाहीदने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून विश्वासात घेतले. १७ एप्रिल २०२४ ते १ मे दरम्यान संशयिताने पीडितेस जळगाव आणि धुळ्यातील विविध ठिकाणी, तसेच देवपूरमधील एका भाड्याच्या खोलीत नेऊन तिच्यावर अत्याचार केला.



लग्नाला नकार आणि फसवणूक

गेल्या दोन वर्षांपासून हा प्रकार सुरू होता. दरम्यान, तरुणीने शाहीदकडे लग्नाचा तगादा लावला, तेव्हा त्याने लग्नास स्पष्टपणे नकार दिला आणि पीडितेसोबत वाद घालत तिला मारहाण केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने सोमवारी (ता. ८) एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

दोघेही विवाहित?

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, संशयित आरोपी शेख शाहीद फारुख हा आधीच विवाहित असून त्याला तीन मुले आहेत. तसेच, तक्रारदार पीडित तरुणीचेही लग्न झालेले असून तिला दोन अपत्ये असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे.

पोलिसांचा तपास सुरू

पीडितेच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी शाहीद शेख फारुख याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर संशयित आरोपी पसार झाला असून पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक माधुरी बोरसे करत आहेत.

वडिलांच्या मित्राकडून 17 वर्षीय अल्पवयीन मुलीवर नको तेच...

पीडिता चार महिन्यांची गर्भवती राहिली

आरोपी इथवरंच न थांबता त्याने वारंवार भीती दाखवून तिच्याशी जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवले. काही दिवसांपासून पीडितेला उलट्या आणि पोट दुखू लागलं. त्यानंतर पालकांनी तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. रुग्णालयात पीडितेवर सोनोग्राफी करण्यात आली असता, ती पीडित मुलगी चार महिन्यांची गर्भवती राहिली होती. पालकांनी पीडितेची विचारपूस केली असता, तिने आपल्यावर लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती दिली.

■वर्धा। **प्रतिनिधी,**

जालना जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. परतूर तालुक्यात वडिलांच्या मित्राने एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या लज्जास्पद घटनेनं परिसर हादरून गेला आहे. पोलिसांनी संशयित आरोपी नवनाथ सोपान आयंदेविरूद्ध गुन्हा दाखल केला. नराधमाने पीडितेला गर्भवती ठेवल्याची माहिती समोर आली.

चार महिन्यांपूर्वी पीडितेवर जबरदस्ती लैंगिक संबंध ठेवले

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित मुलीने बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते, ती आपल्या पालकांना शेतीच्या कामात मदत करत होती. संशयित आरोपी नवनाथ आयंदे हा पीडित मुलीच्या वडिलांचा मित्र होता. तो सतत त्यांच्या घरी ये-जा करायचा. चार महिन्यांपूर्वी पीडित मुलगी शेतात काम करताना नराधमाने शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली. तिने नकार दिल्यानंतर आरोपीने जबरदस्ती केल्याचा आरोप पीडितेनं तक्रारीत नमूद केला आहे.

संबंधित प्रकरणी 7 जून रोजी माजलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. नंतर हाच गुन्हा शून्य क्रमांकाने आष्टी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. दरम्यान, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या घटनेनं परिसरातील नागरिकांनी संपात व्यक्त केला आहे.



सावत्र बाप 8 वर्षीय मुलीला कपडे काढायला लावायचा अन्...

■नागपूर। **प्रतिनिधी,**

नागपूर येथील नंदनवन पोलीस ठाणे परिसरात लाज आणणारा प्रकार उघडकीस आला. सावत्र बापाने 8 वर्षीय पीडित मुलीशी अश्लील वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकरण समोर आलं. पोलिसांना या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला अटक केली आणि त्याला तुरूंगात टाकण्यात आले. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेनं परिसर हादरून गेला आहे.

आरोपी सावत्र बाप हा दारूच्या नशेत असताना त्याने लहान मुलीसोबत घाणेरडं कृत्य केलं. फियार्दीने पोलिसांना सांगितलं की, आरोपी मुलींना गोळ्या द्यायचा, नंतर कपडे उतरवायला सांगायचा आणि अश्लील कृत्य करायचा. यादरम्यान सावत्र बापाने मुलीसोबत घृणास्पद कृत्य केलं.

हा धक्कादायक प्रकार 5 जून रोजी रात्री नंदनवन पोलीस ठाणे परिसरातून उघडकीस आला. पीडितेच्या आईने नंदनवन पोलीस ठाणे गाठत प्रकरणाची पोलिसांकडे तक्रार दाखल केली. फियार्दी आईच्या पहिल्या नव याची 2011 मध्ये मृत्यू झाला होता, यानंतर 2016 मध्ये आरोपीशी दुसरा विवाह केला. फियार्दीला पाहिल्या नव यापासून दोन मुली आहेत. त्यापैकी एकीवर आरोपीने जबरदस्ती केली.

पीडित आईने तात्काळणे नंदनवन पोलीस ठाण्यात दाखल होत तक्रार दाखल केली. पोलिसांनी पॉक्सो कायद्यांतर्गत आरोपीवर गुन्हा दखल केला, नंतर आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००० १४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com